## ३. स्त्रीच्या मनातील आत्महत्येचा विचार

धोकादायक परिस्थितीत स्त्रीची इच्छाशक्ती शाबूत असते तोवर ती विरोध करते. परंतु सतत होणाऱ्या मारहाणीनंतर तिच्यामध्ये परिस्थितिशी झगडण्याची ताकद कमी व्हायला लागते. 'आपले भोग संपत नाहीत, तर आपला जीवच संपवू.' अशा विचारांची गर्दी होऊ लागते. अशा वेळी तिला स्वतःकडून असलेला धोका समजून घेण्यासाठी हा आलेखस्तंभ :

१. "स्वतःचे आयुष्य संपवून टाकावे." असा विचार तुमच्या मनात येतो का?

होय/ नाही

२. आत्महत्येचे विचार काढून टाकण्याचा प्रयत्न केल्यानंतरही परत परत डोकावतात का?

होय/ नाही

३. तुम्हाला मारहाण करणाऱ्यांना तुम्ही आत्महत्येचे विचार बोलून दाखविले आहेत का?

होय/ नाही

४. घरातल्यांना आत्महत्येची धमकी दिली की त्यांच्याकडून होणारा त्रास तात्पुरता थांबतो असे तुम्हाला वाटते का?

होय/ नाही

एकूण गुण:

या तक्त्यातील एकजरी उत्तर 'होय' असेल, तर धोक्याची पातळी 'तीव्र' मानावी. जितक्या जास्त प्रश्नांना 'होय' म्हणून उत्तर येईल, तितकी आत्महत्येची शक्यता जास्त.

*(संदर्भ – 'चक्रभेद' – लेखन – मनीषा गुप्ते, अर्चना मोरे – मासूम प्रकाशन – वर्ष १० डिसेंबर २०१०)*